**फाईल क्र.१४७७(१)/२०१९/१४-अ** **दिनांक : २३ मे, २०१९.**

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

## राज्य सेवा (पूर्व) परीक्षा-२०१९

## घोषणा

### जाहिरात क्रमांक (५०/२०१८)

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दिनांक १७ फेब्रुवारी, २०१९ रोजी घेण्यात आलेल्या राज्य सेवा (पूर्व) परीक्षा-२०१९ चा निकाल दिनांक **२३ मे, २०१९** रोजी जाहीर करण्यात आला आहे. सदर पूर्व परीक्षेत अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांच्या बैठक क्रमांकाची यादी व गुणांची सीमारेषा आयोगाच्या **www.mpsc.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

२. प्रस्तुत पूर्व परीक्षेसाठी उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने केलेल्या अर्जात दिलेल्या माहितीच्या आधारे, त्यांच्या पात्रता तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून, पूर्व परीक्षेच्या निकालाआधारे मुख्य परीक्षेस पात्र ठरलेल्या उमेदवारांपैकी मुख्य परीक्षेसाठी विहित कालावधीत अर्ज करणाऱ्या व परीक्षा शुल्क भरणाऱ्या अर्हताप्राप्त उमेदवारांनाच मुख्य परीक्षेस प्रवेश देण्यात येईल. अशा तपासणीनुसार अपात्र ठरणाऱ्या उमेदवारांची उमेदवारी आयोगाकडून कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

**३.** अंदाजित वेळापत्रकानुसार राज्य सेवा मुख्य परीक्षा २०१९, दिनांक १३, १४ व १५ जुलै, २०१९ रोजी घेण्यात येणार आहे.

**४.** प्रस्तुत निकालाआधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या व अर्जात प्राविण्यप्राप्त (गुणवत्ताधारक) खेळाडूचा दावा केलेल्या उमेदवारांनी शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दिनांक १ जुलै, २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार व त्यास अनुसरुन प्रसिध्द करण्यात आलेल्या दिनांक १८ ऑगस्ट, २०१६ रोजीचे शुध्दीपत्रक व दिनांक ११ मार्च, २०१९ रोजीचे शुध्दीपत्रक आणि तद्नंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार विषयांकित गट-'अ' व 'ब' पदांसाठी निश्चित केलेली क्रिडा विषयक अर्हता धारण करीत असल्याबाबत, पूर्व परीक्षेचा अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकाचे म्हणजेच दिनांक ४ जानेवारी, २०१९ रोजीचे किंवा तद्पूर्वीचे क्रिडा प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. तसेच परीक्षेचा अर्ज भरण्याच्या अंतिम दिनांकापूर्वीची संबंधित उपसंचालक क्रिडा व युवक सेवा यांच्याकडे प्रमाणपत्र पडताळणीसाठी अर्ज सादर करणे व त्यासंदर्भातील पोचपावती सादर करणे बंधनकारक आहे. तद्नुषंगाने संबंधित खेळाडू उमेदवारांनी त्यांच्या क्रीडाविषयक प्रमाणपत्राची विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा संचालनालय यांचेकडून तातडीने पडताळणी करुन घेऊन मुलाखतीच्यावेळी क्रीडा पडताळणी अहवाल सादर करणे आवश्यक आहे.

**५.** प्रस्तुत परीक्षेचा निकाल समांतर आरक्षणाच्या मुद्यांसंदर्भात विविध मा.न्यायालयात/मा.न्यायाधिकरणात दाखल करण्यात आलेल्या न्यायिक प्रकरणातील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून प्रसिध्द करण्यात आला आहे.

**६.** मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे दाखल मूळ अर्ज क्रमांक ११२९/२०१८ प्रकरणी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल रिट याचिका क्रमांक २०५३/२०१४ व जनहित याचिका क्रमांक १७५/२०१८, मूळ अर्ज क्रमांक ९९/२०१९ प्रकरणी तसेच यासंदर्भात अन्य प्रकरणी होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून निकाल प्रसिध्द करण्यात येत आहे.

**७.** प्रस्तुत पूर्व परीक्षेच्या निकालाच्या आधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना त्यांनी अर्जात नमूद केलेल्या मोबाईल क्रमांकावर एसएमएसव्दारे कळविण्यात येईल. मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी उमेदवाराने ऑनलाईन पध्दतीने आवश्यक माहिती व परीक्षा शुल्क विहित मुदतीत विहित पध्दतीने सादर करणे आवश्यक राहील. त्याशिवाय उमेदवारास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येणार नाही. तसेच, पूर्व परीक्षेसाठी सादर केलेल्या अर्जातील दावेच मुख्य परीक्षेकरिता स्विकारार्ह ठरतील.

**ठिकाण: मुंबई**

**उप सचिव [परीक्षा-१],**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.**